र.नं. : ई-५९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ उत्सव/ 919 /२०२५

दिनांक:- 9 JUN 2025

प्रति,

-----------------------------

-----------------------------

-----------------------------

**विषय:- भक्तमंडळ सभासदांना श्री गुरुपौर्णिमा उत्सव व श्री पुण्यतिथी उत्सव- २०२५ चे उदी-प्रसाद पाठविणेकामी पाकिटे छपाईसाठी सिलबंद दरपत्रक देणेबाबत.**

श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२५ व श्री पुण्यतिथी उत्सव-२०२५ निमित्ताने भक्तमंडळ सभासदांना पोष्टाद्वारे उदी प्रसाद पाठविणेकामी विहित नमुन्यात पाकिटे छपाई करुन घ्यावयाचे असून, खालील तपशील व अटी/ शर्तीस अनुसरुन सिलबंद पाकिटामध्ये दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ.नं. | श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२५ करिता | नग संख्या | जीएसटी व शिर्डी पोहोचसह दर प्रती नग रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | **पाकीटे (प्रिंटेड पाकीटे)**<br>Size- 4” x 5.5”<br>PAPER- 80 GSM MAPLITHO WHITE<br><br>(One Colour Printing matter- on Top of packet)<br>SHREE SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI<br>SHREE GURUPOURNIMA FESTIVAL- 2025<br>UDI & PRASAD- WITH BLESSINGS OF SHREE SAIBABA.<br><br>(Bottom of packet)<br>If undelivered, Please return to:<br>CHIEF EXECUTIVE OFFICER,<br>SHREE SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI<br>Tal.Rahata, Dist.Ahilyanagar,<br>Maharashtra, India- 423109. | 18,800 | | |

प.नं. : ई-५९, अहमदनगर

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

शिर्डी : पोष्ट : शिर्डी - ४२३ १०९, ता. राहाता, जि. अहमदनगर, महाराष्ट्र (भारत).
दुरध्वनी : +९१-२४२३-२५८ ५०० फॅक्स : +९१-२४२३-२५८ ७७०, टेलिग्राम : साईनाथ, शिर्डी.

<u>याकामी खालील अटी व शर्ती बंधनकारक राहतील-</u>

१) प्रिंटेड पाकीटांचे दर GST व सर्व करांसहीत शिर्डी पोहोचचे भरावयाचे आहेत.

२) प्रिंटेड पाकीटे छपाईचा कार्यादेश मिळाल्यापासून ०८ दिवसात छपाई करुन देण्यात यावी.

३) छपाई करावयाचे पाकीटांचा नमुना इकडील कार्यालयाकडून अंतिम करुन घ्यावा व नंतरच छपाई करण्यात यावी.

४) श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२५ व श्री पुण्यतिथी उत्सव २०२५ चा प्रती उत्सव १८,८०० याप्रमाणे पाकिटे छपाई करुन द्यावी लागतील.

५) प्रिंटेड पाकीटे छपाई झालेनंतर संस्थानचे भक्तमंडळ कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत स्वःखर्चाने पोहोच करुन देण्यात यावे.

६) पुरवठा करीत असलेली प्रिंटेड पाकीटे संस्थानकडुन Randomly Sample घेऊन स्वीकारले जातात. तथापी सदर प्रिंटेड पाकीटे स्विकारल्यानंतरही काही पाकिटे खराब आढळल्यास ती स्वखर्चाने बदलून द्यावी लागतील.

७) संपुर्ण छपाई प्राप्त झाल्यानंतर बीलाची रक्कम संस्थानचे विहीत पध्दतीने अदा करण्यात येईल.

८) बिलासोबत बॅंक डिटेलच्या छायांकित प्रती सादर करणेत याव्यात.

९) प्रेस धारकाने प्रिंटेड पाकीटे पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थान प्रशासनाने नमूद केलेले कुठल्याही अटी व शर्तीचा भंग झाल्यास याबाबत संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल, तो आपणावर बंधनकारक राहील, याबाबत प्रेसधारकाची काहीही तक्रार चालणार नाही.

१०)सदचे व्यवहारामध्ये काही वाद निर्माण झाल्यास तो राहाता कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

११)दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क संस्थानने राखुन ठेवला आहे.

१२)सिलबंद दरपत्रके स्विकारणेचे अंतीम मुदत दि.१४/०६/२०२५ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत.

१३)छपाई नमुना कार्यालयात उपलब्ध आहे.

(प्रज्ञा महांडुळे)
प्रशासकीय अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी.